





# दखल

## कोव्हिड योद्ध्यांची

(आरोग्य हक्कांसाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची)

साथी प्रकाशन

Support for Advocacy and Training to Health Initiatives

# दखल- कोव्हिड योद्ध्यांची

## (आरोग्य हक्कांसाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची)


* पहिली आवृत्ती
  **सप्टेंबर २०२०**
* लेखन-संपादन
  **तृप्ती मालती व भाऊसाहेब आहेर**
* संकलन
  **ज्योती शेळके, सुशील माने**
* मुखपृष्ठ संकल्पना, कलानिर्देशन व मुद्रितशोधन
  **शारदा महल्ले**
* मुद्रण
  **संस्कृती प्रिंटर्स, पुणे**
* विशेष सहकार्य-
  **आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील सर्व संस्था व कार्यकर्ते**
* साभार
  **इंटरनॅशनल बजेट पार्टनरशिप**
* प्रकाशक
  **साथी**
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
  डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०३८
  फोन : ०२० - २५४७२३२५ / २५४७३५६५
  ई-मेल : sathicehat@gmail.com
  वेबसाईट : www.sathicehat.org



# दखल
# कोव्हिड योद्ध्यांची

## (आरोग्य हक्कांसाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची)


**साथी प्रकाशन**

**Support for Advocacy and Training to Health Initiatives**

# अनुक्रमणिका


'मानधना'विषयी आशांना मिळाली माहिती ..... ०५
अक्कलकोट तालुक्यातील स्थलांतरित लोकांचा विलगीकरणाचा प्रश्न मिटला ..... ०६
कोव्हिड काळात येल्डा प्राथमिक आरोग्य पथकास मिळाले कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी! ..... ०८
कोव्हिड काळातील कामाची दखल घेतल्याबद्दल कर्मचारी व समिती सदस्यांनी व्यक्त केली कृतज्ञता ..... १०
होय... रेशन पुरवठा अधिकाऱ्यांना कायदा व नियमांची जाणीव करून दिली. ..... १२
गाव आरोग्य समितीच्या पुढाकारामुळे आरोग्य सेविकेला मिळाली राहण्याची जागा ..... १४
व्हॉट्सअपचा झटका... कंत्राटी आरोग्य सेविकेस मिळाली उपकेंद्रात राहायला जागा ..... १६
कोरोनाची शास्त्रीय माहिती मिळाल्याने गैरसमज झाले दूर... ..... १८
जीआरच्या दणक्यामुळे काकड कुटुंबाला मिळाले 'मोफत रेशन'... ..... १९
तुळजापूर परिसरात कोरोना तपासणीमुळे पुढील साथ रोखण्यात यश ..... २०
संस्थेच्या मदतीने अंगणवाडी सेविकांच्या कामातील अडचणी झाल्यात दूर... ..... २१
घाटाळ कुटुंबाला मिळाले वर्षभराचे 'हक्काचे रेशन'...! ..... २२

मानेगावच्या महिलांनी फायनान्स कंपनीला शिकविला धडा...... २४
...अखेर आशांना मिळाली आवश्यक औषधी २६
रेशन धान्याचा भ्रष्टाचार आणला उघडकीस २८
बिसनी गावातील दहा कुटुंबांना मिळाले ‘रेशन’ ३०
अखेर आशांना मिळाले ‘मास्क’...! ३२
संस्था कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने वेंगरुळ गावातील कुटुंबांना मिळू लागली नियमित रेशन ३४
आरोग्य समिती व सरपंच यांच्या पुढाकारातून अंगणवाड्यांना मिळाले वजन काटे.... ३५
‘ऑनलाईन सर्व्हे’मुळे लोहारा तालुक्यातील बरेच प्रश्न लागले मार्गी ३६
पावले चालती... सुरक्षेची वाट ३८
‘कोव्हिड केअर सेंटर’मधील भोंगळ कारभाराला बसला आळा... ३९
कुपोषणाच्या विळख्यातून होम व्हीसीडीसीने केली बालकांची सुटका ४०
टाळेबंदीत एचआयव्हीबाधित रुग्णांना गोपनीयता पाळून घरपोच पुरवली औषधी आणि आहार... ४२
स्वयंसेवकांच्या पुढाकारामुळे सुटला गुरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न ४५
साथीमार्फत कोविड १९ विषयीच्या प्रशिक्षणाचा झाला फायदा! आशा व आरोग्य सेविकांची बोलकी प्रतिक्रिया ४६

प्रस्तावना

# दखल कोव्हिड योद्ध्यांची

जगभरात आणि देशात आलेल्या कोव्हिड-१९च्या साथीने थैमान घातलेले असताना कोव्हिड आजाराच्या बरोबरीने लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात पुढे आला. सरकारने अचानकपणे सुरू केलेल्या लॉकडाउनचा विपरीत परिमाण सर्वसामान्य कष्टकरी जनतेवर झाला. त्यामुळे लॉकडाउनच्या काळात स्थलांतरित कष्टकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे आपापली घरे गाठत होते. या सगळ्या परिस्थितीमध्ये गावांमध्ये करोनाची वाढती भीती आणि बाहेरून येणारे स्थलांतरित मजूर यांचे प्रश्न सोडवताना गावातील लोकांनी आपापल्या परीने खूप प्रयत्न केले.

याच काळात सरकारने लागू केलेल्या योजना कष्टकरी जनतेपर्यंत पोचव्यात म्हणून, साथीच्या काळात अहोरात्र झटणाऱ्या आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना मदत करून त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि गरीब गरजू आणि कष्टकरी जनतेला तिच्या हक्काची आरोग्य सेवा आणि इतर अत्यावश्यक सेवा मिळवून देण्यासाठी गावातील समित्यांचे सदस्य आणि देखरेख प्रक्रियेचे कार्यकर्ते यांनी केलेल्या प्रयत्नांच्या गोष्टी या पुस्तकात मांडल्या आहेत.

'लोकाधारित देखरेख आणि नियोजन' या प्रक्रिये अंतर्गत १३ जिल्ह्यातील २८ तालुक्यात सुरू आहे, प्रक्रियेसाठी कार्यरत असलेले स्थानिक समित्यांचे सदस्य आणि देखरेख प्रक्रियेचे कार्यकर्ते ज्यांनी - ज्यांनी कोव्हिडच्या संकटकाळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्यांना आपले हक्क मिळवून देण्याचे प्रयत्न केले त्या सगळ्या कार्यकर्त्यांना ही पुस्तिका समर्पित..

तृप्ती मालती

■

# ‘मानधना’विषयी आशांना मिळाली माहिती

पुष्पलता तिरपुडे
आम्ही आमच्या आरोग्यासाठी
ता. आरमोरी, जि. गडचिरोली

‘साथी’ संस्थेच्या पुढाकाराने आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि गाव आरोग्य समिती सदस्य व संस्था कार्यकर्त्यांसोबत कोरोनाशी संबंधित माहिती घेण्यासाठी ऑनलाइन सर्व्हे करण्यात आला. हा सर्व्हे करत असताना गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यामध्ये ‘आम्ही आमच्या आरोग्यासाठी’ संस्थेच्या कार्यकर्त्या पुष्पलता तिरपुडे यांनी आशांशी संवाद साधला असता माहिती मिळाली की, आशा सेविकांना गावात कोरोना सर्व्हे करण्याचे काम आरोग्य विभागाकडून देण्यात आले होते. त्यासाठी त्यांना मासिक मानधन रु.१०००/- देखील मंजूर केले होते. आशा सेविकांनी मात्र त्यांना ग्रामपंचायतीकडून एकदाच रु. १०००/- मिळाले असल्याचे सांगितले. संस्था कार्यकर्त्या पुष्पाताईंनी याबाबत तालुका आरोग्य अधिकारी व आशा तालुका समन्वयक यांच्याशी त्वरित संपर्क करून याबाबत चौकशी केली असता असे समजले की, सर्व आशांचे दर महिन्याचे मानधन रु.१०००/- त्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. पुष्पाताईंनी पुन्हा ही माहिती सर्व आशा सेविकांना दिली. तसेच त्यांना त्यांचे बँक खाते देखील तपासून घेण्यास सांगितले. तसे केल्यानंतर लक्षात आले की सर्वांचे मानधन वेळच्या वेळी खात्यावर जमा झाले आहे. यामध्ये अडचण किंवा मुद्दा केवळ हाच होता की आशांनी देखील वेळोवेळी मानधनाबद्दल बँकेत जाऊन चौकशी करणे किंवा पासबुक अपडेट करून घेणे. पुष्पाताईंनी वेळीच सर्वांना संपर्क केल्याने आशांना त्यांच्या कामाच्या मोबदल्याचा पाठपुरावा करता आला.

■

# अक्कलकोट तालुक्यातील 'स्थलांतरित लोकांचा विलगीकरणाचा प्रश्न' मिटला.

प्रबोध कांबळे
अक्कलकोट तालुका समन्वयक
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.

कोव्हिड १९ महामारीने जगामध्ये मोठ्या प्रमाणात थैमान घातले आहे. या आजाराचे लोण देशात, राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात आणि शेवटी गावापर्यंत येऊन धडकले आहे. पूर्वी बिमारीचा गड्डा, पिलकीचं वार असे महाभयंकर रोग आले की गावंच्या गावं ओस पडायची. घराचे दरवाजे लावायला कोणी नसायचं इतकी माणसं मरायची. कोरोनावर औषध नाही आणि त्याची लस उपलब्ध नसल्यामुळे अजूनच भीती वाढू लागली. २२ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन झाल्यानंतर पुणे, मुंबई शहरात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत होती. गावाकडची पोट भरण्यासाठी, कामधंद्यासाठी, शहराकडे गेलेली मंडळी तिथं जगणं असह्य झाल्यामुळे गावाकडे परतत होती. मग मात्र कोरोनानं चिंता अधिकच वाढवली. बाहेरून गावात आलेले लोक विलगीकरणात जायला तयार नव्हते. आता या लोकांचं काय करायचं? हा प्रश्न गावकऱ्यांना पडला. कोव्हिड आणि आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आपण काय करायला हवं याबाबत आमचं 'साथी'मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण झाल्यामुळे यातून काय मार्ग काढायचा हे आम्हाला समजलं होतं. त्यानुसार आम्ही गावातील लोकांशी बोलायला सुरुवात केली. गावातील पुढाऱ्यांना समजावून सांगितले.



गावाची काळजी गावानेच घेतली पाहिजे म्हणून सरकारने सरपंच, पोलीस पाटील, आशा, अंगणवाडी सेविका यांची 'कोरोना विरोधी दक्षता समिती' बनवलेली होती. या समितीचं काम म्हणजे 'गावाला कोरोना होऊ देण्यापासून रोखायचं' असे त्यांना समजावून सांगितले. त्यानुसार ही मंडळी कामाला लागली. स्थलांतर करून आलेल्या मंडळींना या आजाराबद्दल समजावून सांगून बाहेरून गावात येणाऱ्या लोकांना विलगीकरणासाठी तयार केले. उदा. शहरांमध्ये तुम्ही पाहिलेली व अनुभवलेली परिस्थिती, तिथे वाढलेले कोरोनाचे रुग्ण, त्यांचे हाल, लॉकडाऊनमध्ये भोगलेले भोग असे चित्र. तुम्ही १४ दिवस विलगीकरणात राहिलात तर तुम्हाला आणि गावालाही धोका कमी होईल. चुकूनमाकून गावात हा आजार पसरला तर गावात पुरेसी आरोग्य सेवाही उपलब्ध नाही. त्यामुळे आपल्या लोकांचे आरोग्य आणि जीवन आपल्याच हातात आहे, असे समजावून सांगितल्यामुळे हे लोक अखेर विलगीकरणास तयार झालेत. गावामध्ये काहींना जिल्हा परिषदेच्या शाळेत तर काहींना शेतात विलगीकरणाची सोय केली. त्यांना घरून रोज डबा पोहचविण्याची व्यवस्था केली. अखेर संवादातून गावातच हा प्रश्न सोडविण्यात आला.

■

# कोविड काळात येल्डा प्राथमिक आरोग्य पथकास मिळाले कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी

सतीश कांबळे
मानवलोक संस्था,
ता. अंबेजोगाई, जि. बीड

मौजे येल्डा, अंबेजोगाई तालुक्यापासून १६ कि.मी. अंतरावरील डोंगर परिसरातील गाव. या गावाची लोकसंख्या सुमारे २५०० असून गावातील बरीचशी कुटुंब दरवर्षी जिल्ह्याबाहेर ऊसतोडीसाठी स्थलांतरित होत असतात. मराठवाड्यातील बीड जिल्हा सतत दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. या दुष्काळामुळे सतत न पिकणारी शेती, उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची जाणवणारी सततची टंचाई. दूधविक्री व्यवसाय व ऊसतोडीला जाणे हा येथील गावकऱ्यांचा दरवर्षीचा नित्यक्रम.

गावातील आरोग्याची व्यवस्था म्हणजे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य पथक. जोडीला तीन अंगणवाड्या. गावातील दोन आशा कार्यकर्त्यांपैकी एका कार्यकर्तीचे पद रिक्त आहे. तर आरोग्य उपकेंद्र असून अडचण व नसून खोळंबा अशी अवस्था आहे.

येल्डा प्राथमिक आरोग्य पथकाची रचना म्हणजे एक वैद्यकीय अधिकारी, एक औषध निर्माता, एक आरोग्य सेविका व एक परिचर. हे गाव डोंगर परिसरात असल्याने बऱ्याच वेळा येथे वैद्यकीय अधिकारी येण्यास उत्सुक नसतात. पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी पद मंजूर असूनही तालुक्यातील रिक्त पदांमुळे इतरत्र नेमणूक होत असल्याने या भागातील नागरिकांना सतत आरोग्य सेवा घेण्यासाठी वंचित राहावे लागते.



बाहेर गेलेले ऊसतोड मजूर लॉकडाऊनमुळे गावात परत आल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रावर अधिक ताण पडू लागला. त्यात प्राथमिक आरोग्य पथकातील वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक आठवड्यातून तीन दिवस, तालुक्याच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रात झाली असल्यामुळे गावातील लोकांना साधा ताप, सर्दी, खोकला व गरोदर महिलांना तालुक्याच्या ठिकाणी जाऊन मिळणारी आरोग्य सेवा कडक लॉकडाऊनमुळे मिळत नव्हत्या.

आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेअंतर्गत गावातील कार्यकर्ते, गाव पातळीवरील ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांनी हा मुद्दा गावाचे सरपंच यांच्या निदर्शनास आणून दिला. समितीने याबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सतत पाठपुरावा सुरू ठेवला. परिणामी सध्या पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक प्राथमिक आरोग्य पथक, येल्डा येथे करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी गावात येत नसतील तर लगेच तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी असे कळविण्यात आले. त्यामुळे बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेला प्रश्न समिती सदस्यांच्या पुढाकाराने सुटण्यास मदत झाली. आता या गावात नागरिकांना आरोग्य सेवा वेळेवर मिळत आहे.

■

# कोव्हिड काळातील कामाची दखल घेतल्याबद्दल 'कर्मचारी व समिती सदस्यां'नी व्यक्त केली कृतज्ञता...

शिवाजी गुरव, तालुका समन्वयक
ता. आजरा, जि. कोल्हापूर

आपणास साहित्याचे कीट मिळाले का? औषधाचे कीट मिळाले का? या बरोबरच आपणास कामाचा मोबदला/मानधन मिळाले का? मिळाले तर किती आणि नाही मिळाले तर का नाही मिळाले? तसेच आपणास काम करताना काही अडचणी येतात का? कोरोना काळात 'साथी' संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व्हेमधून आशा व अंगणवाडी ताईंकडून ही माहिती घेतली गेली. 'अवनी ॲप'च्या मदतीने आशांना फोन करून ही माहिती विचारली जात होती. 'कोणीतरी काळजीने व आस्थेने आमची विचारपूस करते, आजवर आमच्याकडून फक्त कामच करून घेतले गेले. कोव्हिडचे काम करीत असताना आम्हाला काय अडचणी येतात याबाबत इतक्या आपुलकीने कोणी चौकशी केली नव्हती. त्यामुळे आमच्या कामाचे चीज झाले' अशा शब्दात आशाताईंनी 'साथी' व 'संग्राम' संस्थेचे आभार शिवाजी गुरव यांना प्रत्यक्ष फोन करून व्यक्त केले.

यावरून काम करणाऱ्या यंत्रणेमध्ये मानधन किती मिळाले, या बरोबरच अहोरात्र प्रामाणिक काम



करणाऱ्या गाव स्तरावरील कर्मचाऱ्यांना कामाबाबत काळजी घ्या! म्हणत त्यांची प्रेमाने चौकशी केली तरी आपल्या कामाचे चीज झाले असे त्यांना वाटते. आजरा तालुक्यातील जेऊर, कासार कांडगाव, गवसे येथून काही आशा व अंगणवाडी ताईंचे फोन आले.

गाव आरोग्य समिती सदस्यांना (सरपंच व पोलीस पाटील, गावातील दक्षता समिती सदस्य) देखील आरोग्य सेवेबद्दल माहिती विचारली असता त्यांनीही कोरोना काळात आपण काय काय काम केले याची सविस्तर माहिती दिली. शिवाय आमच्या कामाची कुणी तरी दखल घेतंय याचीही पावती दिली.

तर उत्तूर येथील हनुमान तरुण मंडळाने वाफेच्या दहा मशिन प्रदान कार्यक्रम घेतला त्यावेळी मा. प्रांताधिकारी डॉ. संपत खिलारी व तहसीलदार अहिर यांनी शिवाजी गुरव व त्यांची टीम (C.B.M.) यांच्या कामाचा उल्लेख केला व कोरोना संकटात सर्वांनी जागरूकपणे काम करण्याची सूचना त्यांनी सर्वांना दिली. काम करणाऱ्यांना आपल्या कामाबाबत कोणीतरी पाठीवर थाप मारावी असे वाटते व जोमाने काम करता येते हे मात्र नक्कीच.

■


# होय...रेशन पुरवठा अधिकाऱ्यांना 'कायदा व नियमां'ची जाणीव करून दिली.

शिवाजी गुरव, तालुका समन्वयक
ता. आजरा, जि. कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील बेलेवाडी व अर्दाळ या गावातील दोन जणांनी रेशन मिळत नसल्याची तक्रार करून देखील त्यांना दाद मिळत नव्हती. तसेच एका लाभार्थ्याचे जुने कार्ड खराब झाल्यामुळे नवीन रेशन कार्डात पत्नीचे व दोन मुलांचे नाव टाकले नव्हते. त्यांची नावेही नवीन कार्डात टाकायची होती. कोरोना काळात कुणालाच रेशन कमी पडता कामा नये असा सरकारचा आदेश असूनही आणि वारंवार पाठपुरावा करून देखील दाद मिळत नव्हती. 'देखरेख व नियोजन समिती'चे सदस्य शिवाजी गुरव यांना रेशनचा सर्व्हे करत असताना ही बाब निदर्शनास आली.

या लाभार्थ्यांना सोबत घेऊन शिवाजी गुरव हे तडक आजरा तहसील कार्यालयाच्या रेशन पुरवठा विभागात गेले. सर्वात प्रथम दोन्ही लाभार्थ्यांनाच त्यांनी मुद्दा मांडायला लावला. गरज पडली तरच आपण हस्तक्षेप करायचा असं त्यांनी ठरवलं. रेशन पुरवठा विभागातील कर्मचारी या दोन्ही लाभार्थ्यांशी असभ्य भाषेत बोलत असल्याचे व अपुरी माहिती देत असल्याचे शिवाजी गुरव यांनी पाहिले. शेवटी त्या संभाषणामध्ये शिवाजी गुरव यांना हस्तक्षेप करावा लागला. 'या लोकांना वेठीस का धरता?' असे विचारून 'तुमची तक्रार रेशनसंबंधी तक्रारीसाठी असलेल्या हेल्पलाईन नंबरवर करू', असे सांगताच पुरवठा

**रेशन अधिकाऱ्यांना दिलेले पत्र**



१०/८/२०२०

श्री नामदेव मारुती लोखंडे रा. [illegible]

ता. आजरा जी. कोल्हापूर

आमचे रेशनकार्ड [illegible] आहे या रेशन कार्ड मध्ये या पूर्वी माझ्या पत्नीसह पाच नावे होती. कार्ड खराब झाल्या मुळे नविन कार्ड बनवले या मध्ये एक नाव कमी करून कार्ड दिले. ते माझ्या पत्नीचे व दोन मुलांचे नाव वाढवण्यासाठी [illegible] केले, मात्र तहसील कार्यालय तर्फे टाळाटाळ केली जात होती त्यामुळे तालुक्यातील [illegible] कार्यकर्ते.

शिवाजी गुरव यांच्या मदत घेऊन [illegible] संपर्क केला असता कार्डातील नावे वाढवण्यास पुन्हा [illegible] तयार झाले. तालुक्यातील [illegible] माहिती [illegible] व साथी संस्थेच्या कार्यकर्ते यांच्या मुळे न्याय मिळाला कार्यकर्त्याचे व संस्थेचे

आभार

कळावे आपला विश्वासू

नामदेव मा. लोखंडे

अधिकारी वरमले. उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करणाऱ्या पुरवठा अधिकाऱ्यांना रेशनची कायदेशीर माहिती दाखवली तर ते अजूनच घाबरले. त्यांच्या लक्षात आले की, ही मंडळी पूर्ण कायदेशीर माहितीनिशी आणि तयारीने आली आहेत तेव्हा आपण नमते घेतले पाहिजे. यापुढे कोणालाही असे वेठीस धरणार नाही असे अधिकाऱ्यांनी मान्य केले. त्यांनी लगेचच दोन्ही अर्जदारांना रेशन देण्याबाबत व वाढीव नाव रेशन कार्डात नोंदवून प्राधान्य गटात टाकण्याचे आश्वासन दिले. शिवाय याबाबत आणि धान्याबाबत आपण स्वतः पाठपुरावा करू असे सांगितले. आपले हक्क मिळवून घेण्यासाठी 'साथी' संस्थेकडून रेशनबाबत मिळालेल्या माहितीचा लोकांना चांगलाच उपयोग झाला. नामदेव लोखंडे यांनी लगेच ॲफिड्वीट करून अर्ज सादर केला. तसेच साथी संस्था व कार्यकर्ते यांना लाभार्थी लोखंडे यांनी आभार पत्र दिले.


■

# गाव आरोग्य समितीच्या पुढाकारामुळे आरोग्य सेविकेला मिळाली राहण्याची जागा...

पुष्पा तिरपुडे, तालुका समन्वयक
आम्ही आमच्या आरोग्यासाठी,
ता. आरमोरी, जि. गडचिरोली

महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी ह्या तालुक्यात भाकरोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असणारे येंगाडा हे एक उपकेंद्र. लोकधारित प्रक्रियेच्या माध्यमातून 'गाव आरोग्य समिती'ची बांधणी व या समितीला कार्यान्वित करण्याचा नेहमीच प्रयत्न करण्यात आला आहे. सामान्य माणसाला मोफत व चांगल्या प्रतीच्या आरोग्य सेवा सरकारी आरोग्य यंत्रणेकडून मिळाव्यात, यासाठी होत असलेल्या कामात अजून एका प्रयत्नाची भर पडली. ती भर म्हणजे कोरोनाच्या संकटात आरोग्य सेवक आणि सामान्य लोकांची 'कोरोनाविषयी क्षमता बांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे'.

'साथी, पुणे' या संस्थेच्या माध्यमातून कोरोनाविषयीच्या कामाला एप्रिल २०२० मध्ये सुरुवात झाली. संपूर्ण देशभर लॉकडाऊन असल्याने या प्रक्रियेअंतर्गत ऑनलाइन पद्धतीने गावातील आशा, अंगणवाडी सेविका व गाव आरोग्य समिती सदस्यांकडून माहिती घेण्यात आली. ही माहिती घेत असताना समजले की, येंगाडा येथील उपकेंद्रातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका यांची पदे रिक्त आहेत. तसेच तिथे सध्या कार्यरत असणारी कंत्राटी आरोग्य सेविका ही बाहेर गावातून



कामासाठी येणे-जाणे करते. कोरोनाच्या काळात बाहेरून येणाऱ्या व्यक्तींना विलगीकरणामध्ये ठेवले जात असल्याने या आरोग्य सेविकेला गावातील लोकांना आरोग्य सेवा देणे अवघड होऊ लागले. ही बाब 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेच्या कार्यकर्त्या पुष्पाताई तिरपुडे यांनी गाव आरोग्य समिती सदस्यांच्या लक्षात आणून दिली. समिती सदस्यांनी या मुद्द्याचे गांभीर्य ओळखून गावातील लोकांसोबत चर्चा केली. गाव आरोग्य समिती सदस्यांनी या सेविकेला गावातच निवासी राहण्यास सांगितले. परंतु गावात कुठेही घर भाड्याने मिळत नसल्याची अडचण तिने सांगितली.

त्यावर गाव आरोग्य समिती सदस्यांनी त्वरित प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क केला. कंत्राटी आरोग्य सेविकेची खोलीची अडचण सविस्तर सांगितली. परिणामी वैद्यकीय अधिकारी यांनी कंत्राटी आरोग्य सेविका हिला ताबडतोब गावातील उपकेंद्रात राहण्यासाठी परवानगीचे लेखी पत्र दिले. वरिष्ठांकडून मिळालेल्या लेखी सूचना आणि परवानगीमुळे आता ही आरोग्य सेविका येंगाडा उपकेंद्रात निवासी राहून लोकाना चांगली आरोग्य सेवा देत आहे.

■

# ‘व्हॉट्सअपचा झटका’... कंत्राटी आरोग्य सेविकेस मिळाली उपकेंद्रात राहायला जागा

माया कोचे, तालुका समन्वयक,
आम्ही आमच्या आरोग्यासाठी,
ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

कोरोना काळात आरोग्य यंत्रणेला सहकार्य करण्याच्या हेतूने ‘साथी’ संस्था पुणे यांनी ‘कोरोनाबद्दलची शास्त्रीय माहिती व स्थानिक आरोग्य यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे’ या अनुषंगाने ‘आम्ही आमच्या आरोग्यासाठी’ या संस्थेच्या मदतीने गडचिरोली जिल्ह्याच्या कुरखेडा तालुक्यात ऑनलाईन पद्धतीने काम सुरू केले. कुरखेडा तालुक्यातील ३० गावातील आशा, अंगणवाडी सेविका आणि गाव समिती सदस्य यांच्याकडून आरोग्य सेवांच्या स्थितीबाबत ऑनलाइन सर्व्हेक्षणातून माहिती घेण्यात आली. या माहितीतून उराडी उपकेंद्राचा मुद्दा पुढे आला.

कुरखेडा तालुक्यामधील कढोली प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असणारे ‘उराडी’ हे उपकेंद्राचे गाव. या उपकेंद्रातील आरोग्य सेविकेचे एप्रिल २०२० मध्ये प्रमोशन व बदली झाली. त्यामुळे जोपर्यंत नवीन कायमस्वरूपी आरोग्य सेविका रुजू होत नाही तोवर सर्व भिस्त कंत्राटी आरोग्य सेविकेवरच होती. ही आरोग्य सेविका गावात भाड्याने खोली घेऊन राहत होती. परंतु पावसाळा सुरू झाल्याने त्या राहत असलेली खोली गळू लागली. याशिवाय उपकेंद्रात नर्स नसल्याने उपचारासाठी व औषधे घेण्यासाठी लोक त्यांच्या घरी येऊ लागले. राहत असलेली खोली गळतीमुळे नर्सला राहण्यास व सेवा देण्यास अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे त्यांनी उपकेंद्रात येऊन राहावे अशी मागणी गावातील लोकांनी केली.



परंतु बदली होऊन गेलेल्या नर्सचे वैयक्तिक सामान उपकेंद्रामध्ये तसेच होते. त्यामुळे कंत्राटी आरोग्य सेविकेस उपकेंद्रात राहायला जाता येत नव्हते. गावातील लोकांनी बदली झालेल्या आरोग्य सेविकेस फोन करून सामान घेऊन जाण्याची विनंती केली. त्याचा फारसा उपयोग झाला नाही. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेच्या तालुका समन्वयक माया कोचे यांनी देखील फोन करून पाहिला परंतु दाद मिळाली नाही. अखेर माया कोचे व गावातील लोकांनी यावर तोडगा म्हणून वैद्यकीय अधिकारी समाविष्ट असलेल्या व्हाट्सअप ग्रुपवर यासंबंधी मेसेज केला. तसेच माया कोचे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना फोनवर देखील याबाबत कल्पना दिली. समाजमाध्यमांवर आपल्या आरोग्य कर्मचाऱ्याबद्दल नकारात्मक संदेश नको जायला म्हणून वैद्यकीय अधिकारी यांनी याची गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी सदर आरोग्य सेविकेस उपकेंद्र मोकळे करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सदर आरोग्य सेविकेने आपले सामान हलवून कंत्राटी आरोग्य सेविकेस राहण्यासाठी जागा मोकळी करून दिली. 'व्हाट्सअपचा झटका' 'जोर से' लागल्यामुळे तत्काळ कार्यवाही झाली. कंत्राटी आरोग्य सेविका आता उपकेंद्रात राहूनच उत्तम सेवा देत आहेत.

■

# कोरोनाची शास्त्रीय माहिती मिळाल्याने गैरसमज झाले दूर...

गायके,
मराठवाडा ग्रामीण विकास संस्था
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

कोरोनासारख्या गंभीर विषाणूची साथ सगळीकडे पसरलेली असताना आशा सेविका कोरोनाविषयी जाणीवजागृतीचे काम निरंतर करत आहेत. पण या काळात त्यांचे हे काम अधिक प्रभावीपणे करण्यास त्यांना मदत झाली ती 'साथी', पुणे यांच्याकडून देण्यात आलेल्या कोरोनाविषयीच्या शास्त्रीय माहितीच्या प्रशिक्षणाची.

'कोरोना'विषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेला मदत' या प्रकल्पा अंतर्गत साथी संस्था पुणे यांनी माहे जून व जुलै २०२० मध्ये लोकधारित प्रक्रियेतील १३ जिल्ह्यांतील २८ तालुक्यांमध्ये असणाऱ्या गावांमधील आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि गाव आरोग्य सामिती सदस्य व संस्था कार्यकर्त्यांना कोरोनाविषयी योग्य व शास्त्रीय माहिती साध्या व सोप्या भाषेत देण्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षणे आयोजित केली होती. त्याद्वारे कोरोना हा विषाणू नक्की काय हानी करतो?, त्याच्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करायचे?, कोणती काळजी घ्यायची? याशिवाय लोकांच्या मनात कोरोनाविषयी असणारे प्रश्न, गैरसमज कसे दूर करायचे? याबद्दल माहिती देण्यात आली. असलेल्या शंकांबद्दल चर्चाही केली गेली. या प्रशिक्षणातून मिळालेल्या माहितीचा अनेकांना उपयोग झाला. त्याबद्दल औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यात शिल्लेगाव येथे काम करणाऱ्या आशा सेविकेने आपली प्रतिक्रिया नोंदवली. 'त्यांनी सांगितले की, साथीकडून मिळालेली माहिती ग्रामीण भागातील जनतेला सोप्या भाषेत सांगणे सहज शक्य झाले. तसेच गावातील लोकांमध्ये कोरोनाबद्दल खूप गैरसमज होते. ते देखील दूर करणे आणखीनच सोपे झाले.' साथीकडून करण्यात आलेला हा प्रयत्न निश्चितच उपयोगी असल्याचे दिसून येत आहे.'

■

# जीआरच्या दणक्यामुळे काकड कुटुंबाला मिळाले मोफत रेशन...

## साथीची माहिती आणि कार्यकर्तीचे प्रयत्न यातून झाली जनजागृती

बेबीताई कुरबुडे, आरोहन संस्था
ता. जव्हार, जि. पालघर

साथी संस्थेअंतर्गत कोरोनाची सगळीकडे साथ पसरली आणि मार्च २०२० अखेरीस संपूर्ण भारतात लॉकडाऊन लागू झाला आणि गोरगरिबांच्या रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितीमध्ये सरकारने गोरगरीब लोकांना अन्नधान्य सहज आणि पुरेशा प्रमाणात मिळावे म्हणून अंत्योदय, पिवळे रेशन कार्ड धारकांना मोफत धान्य पुरवले. तर केशरी रेशन कार्ड धारकांना विकतचे धान्याच्या पुरवठ्यात सवलतीसह वाढ करून दिली.

याच दरम्यान 'कोरोनाविषयी सामान्य लोकांची क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा' या 'साथी', पुणे संस्थेच्या प्रकल्पामार्फत गावातील लोकांना रेशन मिळते की नाही याचा सर्व्हे करण्यात आला. रेशनविषयी 'साकुर' या आदिवासी गावातून माहिती घेत असताना दि. ९ ऑगस्ट २०२० रोजी असे लक्षात आले की या गावातील 'कृष्णा काकड' यांच्या संपूर्ण कुटुंबाला केवळ रेशन कार्ड नाही म्हणून धान्य देण्यात आले नाही. या कुटुंबात १३ वर्षाच्या आतील सहा मुली असून कुटुंबाची आर्थिक स्थितीही खूपच हलाखीची असल्याची बाब गावातील मंजुळा पवार यांनी संस्था कार्यकर्तीच्या लक्षात आणून दिली. कार्यकर्त्या बेबीताई यांनी गावातील इतर सदस्यांसोबत जाऊन या कुटुंबाची भेट घेतली. रेशन दुकानदाराला भेटून शहानिशा केली असता सदर कुटुंबाकडे आर्थिक उत्पन्नाचा कोणताही पुरावा नसल्याचे समजले. त्यामुळे त्यांना धान्य देण्यात आले नव्हते. परंतु ज्यांच्याकडे रेशनकार्ड नाही त्यांनाही मोफत धान्य देण्याचा जी. आर. समिती सदस्यांनी दुकानदाराला दाखवला. परिणामी १० ऑगस्ट, २०२० रोजी कृष्णा काकड व त्यांच्या कुटुंबाला ३५ किलो मोफत धान्य देण्यात आले. ही माहिती गावातील इतर विना रेशन कार्डधारक कुटुंबाना देखील देण्यात आली.

■

# तुळजापूर परिसरात कोरोना तपासणीमुळे पुढील साथ रोखण्यात यश

ता. तुळजापूर.

तुळजापूर तालुक्यात कोरोंना रुग्ण संख्या वाढत असल्यामुळे रुग्णांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाची 'कोरोना टेस्ट' करण्यासाठी तुळजापूर उपजिल्हा रुग्णालयातील कोरोना सेंटरमध्ये पाठविले जायचे. प्रत्येकाचे सँपल घेऊन त्यांचे रिपोर्ट येईपर्यंत संबंधित व्यक्तीला तेथेच राहावे लागत होते. गावातील इतर लोक कोरोना संक्रमित रुग्णांच्या संपर्कात आले होते. त्यामुळे त्यांचीही टेस्ट करणे गरजेचं होतं. 'परंतु आम्ही कुणाच्या संपर्कात आलो नाही', असं म्हणत ही लोकं टेस्ट करून घ्यायला विरोध करत होते. परिणामी अणदूर या एकाच गावात २५ दिवसात १०० कोरोनाचे रुग्ण सापडले.

गावातील गाव आरोग्य समितीने हा प्रकार संबंधित यंत्रणेच्या लक्षात आणून दिला. सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व इतर लोक प्रतिनिधी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक, यांनी पुढाकार घेतला. गावातच 'रॅपिड टेस्ट' करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पॉझिटिव्ह रुग्णांच्या संपर्कामध्ये आलेल्या व कोरोना सेंटरमध्ये जाऊन टेस्ट न केलेल्या १०० लोकांची गावातच तपासणी करण्यात आली. त्यात ८ जण पॉझिटिव्ह निघाले. हाच संदर्भ देऊन नळदुर्ग गावात देखील सर्व व्यापारी वर्गातील १०० लोकांची तपासणी करण्यात आली. त्यात ५ जण कुठलेही लक्षण नसताना कोरोना संक्रमित असल्याचे समोर आले. वरील अनुभवावरून आरोग्य यंत्रणेनं उस्मानाबाद जिल्ह्यात उपकेंद्र स्तरावरील सर्व CHO यांना आरोग्य विभागाकडून रॅपिड टेस्ट कशी करायची याचे प्रशिक्षण दिले. आता परिसरातील संपर्कामध्ये आलेल्या लोकांची कोरोना तपासणी नळदुर्ग कोव्हिड सेंटरमध्ये सातत्याने आजपर्यंत सुरू आहे.

■

# संस्थेच्या मदतीने अंगणवाडी सेवकांच्या कामातील अडचणी झाल्यात दूर...

तात्यप्पा कांबळे, संवाद संस्था
ता. गारगोटी, जि. कोल्हापूर

आशा व अंगणवाडी सेविका यांना गावपातळीवर 'कोरोना सर्व्हेक्षण' करण्याबाबतचे काम दिले गेले होते. परंतु याच दरम्यान अंगणवाडी सेविकांना अंगणवाडीतील मुलांची वजन व उंची घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले होते. परंतु अंगणवाडी सेविका कोरोनाबाबत सर्व्हेक्षण करतात, अनेक लोकांच्या संपर्कात येतात त्यामुळे आमच्या मुलांना धोका आहे असे वाटत असल्याने पालकांनी अंगणवाडी सेविकांना घरात येण्यास विरोध केला.

याच काळात 'साथी' संस्थेमार्फत कोव्हिड १९ बाबत शास्त्रीय माहितीचे प्रशिक्षण तालुक्यातील आशा, अंगणवाडी सेविका आणि गाव आरोग्य समिती सदस्य यांना देण्यात आले. त्यामुळे आजाराची शास्त्रीय माहिती या कर्मचाऱ्यांना आणि संबंधित लोक प्रतिनिधींना मिळाली. या प्रशिक्षणात अंगणवाडी सेविकांनी हा मुद्दा मांडला. ज्या गावात कोरोनाच्या भीतीपोटी अंगणवाडी ताईंना विरोध होतो त्या गावात जाऊन लोकांमध्ये कोरोनाविषयी माहितीचा प्रचार व प्रसार करण्याचे ठरवले. त्यानुसार 'संवाद' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावातील सरपंच व सदस्यांना याबाबतची माहिती दिली. मुलांची वजन व उंची नियमित घेणे का गरजेचे आहे आणि नाही घेतली तर काय परिणाम होतात याची माहिती सांगितली.

गावातील सरपंचांनी व समिती सदस्यांनी गावामध्ये फिरत्या लाऊडस्पीकरद्वारे माहितीचा प्रसार, प्रचार करून मुलांची वजन व उंची घेण्यासाठी कोणीही विरोध करू नये अशी दवंडी देण्यात आली. दवंडीनंतर अंगणवाडी सेविकांना मुलांची वजन व उंची घेण्यासाठी होत असणारा विरोध बंद झाला आणि मुलांची वजन उंची घेण्यासाठी पालकांकडून सहकार्य मिळू लागले. ■

# घाटाळ कुटुंबाला मिळाले वर्षभराचे 'हक्काचे रेशन..!'

बेबीताई कुरबुडे, आरोहन संस्था
ता. जव्हार, जि. पालघर.

'साथी' संस्थेअंतर्गत 'कोरोनाविषयी सामान्य लोकांची क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा' या प्रकल्पामार्फत, गावातील लोकांना रेशन मिळते की नाही, याविषयी माहिती घेत असताना 'खडखड' गावातील 'सुरेश दौलत घाटाळ' कुटुंबाला एक वर्षापासून रेशन दुकानदाराने रेशन दिले नसल्याचे समजले. रेशन दुकानदार मात्र न चुकता दर महिन्याला त्यांच्या अंगठ्याचे ठसे घेत होता. रेशन कार्डमधील काही बदलांकरिता त्यांचे रेशनकार्ड रेशन दुकानदाराने एक वर्षापासून स्वतःकडे ठेवून घेतले होते. रेशन कार्डात बदल करणे तर दूरच पण दुकानदाराने या कुटुंबाचे रेशन कार्डच हरवल्याचे लक्षात आले. गरीब अशिक्षित कुटुंब म्हटले की असा गैरफायदा नेहमीच घेतला जातो. 'आरोहण' संस्थेच्या कार्यकर्त्या बेबीताई व गाव समिती सदस्य यांनी रेशन दुकानदाराची भेट घेतली. दुकानदार तर तिथे उपस्थित नव्हता. त्याच्या बायकोशी बोलले असता, 'यांच्या घरात प्रत्येकाचे आधार कार्ड वेगवेगळे असल्याने त्यांना धान्य देता येत नाही', अशी अतार्किक आणि नियमबाह्य उत्तरे ती देऊ लागली. त्यांच्या या अशा उत्तरांना प्रत्युत्तर देत बेबीताई यांनी सांगितले की, 'काहीही असले तरी सुरेश घाटाळ हे गावातील कायमचे रहिवासी आहेत. शिवाय त्यांचे रेशन कार्ड दुकानदाराने स्वतःकडे ठेवले तर ते परत देण्याची जबाबदारी



देखील दुकानदाराची असते. याशिवाय शासनाच्या आदेशानुसार कोविड १९ च्या काळातील मोफत धान्य तरी अशा लाभार्थीना दिलेच पाहिजे.' अशा प्रकारचा दबाव आणल्यानंतर दुकानदाराच्या पत्नीने पुढील दोन-तीन दिवसांत धान्य वाटप होणार आहे तेव्हा या कुटुंबाला देखील थोडे फार धान्य देऊ असे सांगितले.

पण प्रश्न होता तो मागील एक वर्षापासून या कुटुंबाला धान्य न देता अंगठे मात्र घेतले जातात त्याचा. याबद्दल चौकशी करणे गरजेचे होते. नक्कीच काहीतरी घोळ असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. बेबीताई व समिती सदस्यांनी याबाबत तहसीलदारांसोबत पाठपुरावा सुरू केला. रेशनच्या प्रश्नांवर काम करत असलेल्या 'श्रमिक मुक्ती संघटने'चे कार्यकर्ते रघू चौधरी यांची भेट घेऊन या मुद्द्यात लक्ष घालण्यास सांगितले. रघुभाऊंनी सर्व कुटुंब सदस्यांची नावे रेशन संबंधित ऑनलाइन नोंदीत आहेत का हे तपासून घेतले. सुरेश घाटाळ यांच्या कुटुंबियांची नावे शासनाकडे नोंद आहेत व २०१९ पासून त्यांना रेशन देखील वेळच्या वेळी मिळत असल्याचे दिसत होते. आता या सर्व गोष्टींचा छडा लावणे खूप गरजेचे होते. शेवटी बेबीताई आणि रघुभाऊ यांनी सुरेश घाटाळ यांच्याकडून नवीन रेशन कार्ड मिळावे म्हणून अर्ज लिहून घेतला. त्यात घडलेली सर्व हकीकत कथन केली. तहसीलदारांना प्रत्यक्ष भेटून याबाबत तक्रार केली. तहसीलदारांनी दुकानदाराला बोलावून घेतले. सर्वांसमोर दटावून विचारले असता त्याने स्वतःची चूक कबूल केली, तसेच या गरीब कुटुंबाचे नुकसान झाले असल्याचे देखील कबूल केले. तहसीलदारांसमोर त्याने सुरेश घाटाळ यांना मागील एक वर्षाचे २०० किलो मोफत धान्य जे त्यांना मिळणे गरजेचे होते ते लगेचच त्यांना देतो असे कबूल केले. दुसऱ्याच दिवशी सर्व धान्य या कुटुंबाला पुरविण्यात आले. प्रकल्पातून मिळालेल्या माहितीच्या आधारे एका गरजू कुटुंबाला त्यांचे हक्काचे वर्षभराचे अन्नधान्य मिळाले आणि त्यांची होणारी उपासमार थांबली..!

■


# मानेगावच्या महिलांनी 'फायनान्स कंपनी'ला शिकविला धडा...

ता. सांगोला. जि. सोलापूर

कोरोना काळात सरकारने कर्ज वसुली स्थगित केली असताना देखील, 'भारत फायनान्स कंपनी'चे अधिकारी हप्ता वसुलीसाठी तगादा लावत असल्याचा मानेगाव येथून फोन आला. सध्याच्या कोरोनाच्या संकट काळात मजुरांना काम नसल्यामुळे 'केंद्र व राज्य सरकारचे ३१ ऑगस्टपर्यंत वसुली करू नका' या स्पष्ट आदेशाचे उल्लंघन असताना देखील हप्त्याची मागणी व वसुलीसाठी लोकांना दमदाटी करणे कायदेशीर नसल्याचे त्या अधिकाऱ्यांना सांगितले.

परंतु भारत फायनान्स कंपनीचा अधिकारी उद्धट भाषेत माझ्याबरोबर बोलला व म्हणाला की, "मी कोणत्याही तहसीलदार, कलेक्टर यांना ओळखत नाही. पैसे काही तहसीलदारांना दिलेले नाहीत. पैसे तुम्हाला दिलेत. मला आत्ताच्या आत्ता पैसे दिले पाहिजेत नाहीतर मी घरासमोरून उठणार नाही." अशा अरेरावीच्या भाषेत फोनवर बोलला. महिलांना सुद्धा अशाच प्रकारे दमदाटी करून, उद्धट बोलून काही महिलाकडून पैसे वसूल केले. पण काही महिलांनी पैसे देण्यास नकार दिल्यावर "तुम्हाला एक तारखेनंतर बघून घेतो, व्याज कसे लावायचे? कसे वसूल करायचे? आम्ही पाहतो" असा दम देऊन निघून गेला.

या विषयाबाबत काही महिलांबरोबर आम्ही कार्यकर्त्यांनी चर्चा केली. सदर अधिकारी हा सकाळपासून काही महिलांच्या घरासमोर बसून उद्धट भाषेत बोलून त्यांच्याकडून पैशाची वसुली केल्याचे समजले. सदर कंपनीकडून गावातील महिला बचत गटामार्फत २० महिलांनी तीन एक लाख कर्ज घेतले होते. कोरोनाच्या या लॉकडाऊन



Gmail

Vijay Bhajanavale <vijaybhajanavale@gmail.com>

भारत फायनान्स सांगोला एजंट / अधिकारी ( विक्रम हैतकाळे ) यांच्यावर त्वरित गुन्हा दाखल करणे बाबत , कारवाई करणे बाबत

8 August 2020

प्रति

तहसीलदार साहेब सांगोला

तालुका सांगोला जिल्हा सोलापूर

Ph no - 9356189625

# भारत फायनान्सच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत

## बचत गटातील महिलांची तहसीलदार यांच्याकडे मागणी

सांगोला/प्रतिनिधी

गेल्या तीन महिन्यापासून सर्वसामान्य कष्टकरी, गरीब जनता यांच्या हाताला काम नाही. हातातोंडाची मिळवणी करता करता नाकी नऊ आले असताना, भारत फायनान्स कंपनीचे अधिकारी एजंट यांनी कर्जाचे हप्ते वसुलीसाठी बचत गटाच्या महिलांना धमकावण्याचे वेळोवेळी त्यांच्या घरी जाण्याचे व उद्धट व दादागिरीची भाषा बोलून महिलांकडून पैसे गोळा करणे असे चित्र सांगोला तालुक्यामध्ये बघण्यास मिळत आहे.

कोरोनाच्या कठीण काळामध्ये सर्वसामान्य जनतेला काम नाही भारत सरकारने वेळोवेळी स्पष्ट आदेश देऊनही ऑगस्टपर्यंत कोणते कर्जाची वसुली करु नये, असे असताना सांगोला तालुक्यामधील मानेगाव येथे भारत फायनान्स अधिकारी विक्रम हैतकाळे यांनी कर्जदार महिलांच्या घरी जाऊन त्यांना

काही महिलांनी कर्जाचे हप्ते देण्यास नकार दिला असता वेळ काळ न बघता त्यांच्या घरासमोर बसून पैसे दिल्याशिवाय मी जात नाही असं मानसिक त्रास दिला. व मी कोणत्याही प्रशासकीय अधिकाऱ्याला ओळखत नाही. मला माझे पैसे द्या मग काय असेल ते बघू अशी भाषा वापरुन सर्वसामान्य महिला बचत गटाच्या सदस्यांना त्रास दिला. यासंदर्भात बाबासाहेब भजनावळे राहणार मानेगाव यांनी रीतसर तहसीलदारांकडे तक्रार दाखल करुन भारत फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अशा तऱ्हेने फायनान्स कंपन्या सर्वसामान्य बचत गटाच्या महिलांना लॉक डाऊन च्या काळामध्ये धमकावणे, अरेरावीची भाषा बोलणे, मानसिक त्रास देणे हे सर्व घडत असताना प्रशासन मात्र काय भूमिका घेते



परिस्थितीमध्ये कामधंदा नसल्यामुळे या कुटुंबांना आपले घर चालवणेच अवघड झाले होते आणि त्यात भारत फायनान्स कंपनीकडून वसुलीसाठी सतत होणाऱ्या त्रासामुळे महिला घाबरल्या होत्या.

संबंधित महिलांशी सविस्तर चर्चा करून आपण सर्वांनी एकत्र मिळून तहसीलदार यांना कळवावे असे ठरले. बचत गटातील सर्व महिलांच्या सह्या घेऊन भारत फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे पत्र माननीय तहसीलदार यांना ८ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता मेल करून पाठवले आणि त्यांची तक्रार नोंद केली. ह्या घटनेची बातमी सांगोला 'सुपरफास्ट पेपर'ला दिली. दोन दिवसानंतर ही बातमी सर्वत्र पसरली. तेव्हा संबंधित अधिकारी इतर महिलांच्या घरच्यांना फोन करून दमदाटी करू लागला. "तुम्ही माझ्यावर चुकीचा आरोप केला आहे, मी तुमच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे" संस्था कार्यकर्ते आणि महिलांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा केला.

स्थानिक महिला आणि कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यातून सदर फायनान्स कंपनीला तहसीलदारांनी नोटीस बजावून सक्त सूचना दिल्या. तेव्हापासून सदर अधिकाऱ्याने पैसे वसूल करण्यासाठी गावांमध्ये कोणालाही फोन केलेला नाही. या घटनेमुळे गावातील बचत गटातील महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. फायनान्स कंपनीकडून वसुलीसाठी मानेगावच्या महिलांनी उठवलेल्या आवाजामुळे पंचक्रोशीतील इतर महिला बचतगटांना देखील फायदा झाला.

■

# ..अखेर आशांना मिळाली आवश्यक औषधी

शुभम हूड,
ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट,
जि. यवतमाळ

महाराष्ट्रात कोरोनाची साथ पसरू नये म्हणून लॉकडाऊनच्या काळात आरोग्य यंत्रणा झपाट्याने कामाला लागली. या यंत्रणेतील खूपच लहानसा परंतु ग्रामीण भागातील आरोग्याच्या कामात अत्यंत महत्त्वाचा असणारा घटक म्हणजे 'आशा सेविका'. कोरोनासारख्या गंभीर विषाणूची साथ सगळीकडे पसरत असताना आशा सेविका लोकांना कोरोनाविषयी सावध करण्यासाठी जाणीवजागृतीचे काम तर निरंतर करत होती, पण त्याचबरोबर लोकांचे नेहमीचे आरोग्याचे प्रश्न देखील सोडवित होती. तिचे हे काम आजही सुरूच आहे.

लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर सुरुवातीला तीन महिने हे काम आशा सेविकांनी मन लावून केले. परंतु त्या पुढील काळामध्ये मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांच्या या कामात खंड पडू लागला. यवतमाळ तालुक्यातील काही आशांना अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. 'कोरोना'विषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे' या प्रकल्पा अंतर्गत 'साथी' संस्था, पुणे मार्फत यांनी मे २०२० मध्ये काही गावातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि गाव आरोग्य समिती सदस्य यांचेकडून स्थानिक समस्या जाणून घेण्यासाठी ऑनलाईन माहिती घेण्यास सुरुवात केली.

ही माहिती घेत असताना यवतमाळ तालुक्यात काम करत असलेल्या 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेच्या कार्यकर्त्यांना




असे लक्षात आले की बऱ्याचशा गावांमध्ये काम करणाऱ्या आशा सेविकांकडे तसेच उपकेंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात नेहमीची औषधे उपलब्ध नाहीत. जसे की केवळ पॅरासिटॅमॉल हेच औषध सगळीकडे उपलब्ध आहे. परिणामी बऱ्याच दिवसांपासून आशा सेविकेकडे गावातील रुग्णाच्या मागणीनुसार औषधे उपलब्ध होत नव्हती.

या समस्येचे निराकरण करणे खूप गरजेचे होते. किंबहुना सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पाचा हाच मुख्य हेतु असल्याने 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी लगेचच याची माहिती संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांना दिली. याशिवाय त्यांना प्रत्यक्ष भेटून घेतलेल्या माहिती अहवालाचा सारांश त्यांच्यासमोर मांडला. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सर्व आशा सेविकांना आवश्यक असणारी सर्व औषधे उपलब्ध करून द्यावीत ही मागणी करण्यात आली. या मुद्दयाचा पाठपुरावा जिल्हा स्तरापर्यंत करण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयातील औषध भांडार विभाग प्रमुखांशी संपर्क करून औषधांबाबत विचारणा केली असता 'पुढील सात दिवसात औषध पुरवठा केला जाईल' असे आश्वस्त केले. संस्था कार्यकर्त्यांनी त्यानंतर आठ दिवसाने पाठपुरावा केला असता आशा सेविकांकडे पॅरासिटॅमॉल, सेट्रिझिन, डायक्लोफिनॅक आणि ओआरएस इ. सर्व औषधे देण्यात आली असल्याचे समजले. या पाठपुराव्यामुळे महत्त्वाचा मुद्दा सुटला आणि रुग्णांची अडचणही दूर झाली.

■

# रेशन धान्याचा भ्रष्टाचार आणला उघडकीस

कल्पना आव्हाळे,
रचना संस्था,
ता. भोर, जि.पुणे

'कोरोना'विषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे' या प्रकल्पा अंतर्गत रेशनविषयी माहिती घेत असताना पुढील घटना समोर आली.

भोर तालुक्यातील कांजळे गावात स्वस्त धान्य दुकानाच्या भोंगळ व भ्रष्टाचारी कारभाराबद्दल लोकांमध्ये संताप होता. लाभार्थी रॉकेल आणि रेशनचे धान्य नियमित व पुरेसे तसेच नियमानुसार मिळण्याची वाट पाहत होते. दुकानदाराबद्दल गावातील लोकांच्या वारंवार तक्रारी येत होत्या.

गावातील दुकानदार लोकांना काही वेळा धान्य कमी देत असे, तर काही वेळेला अजिबातच देत नसत. 'रेशन संपले तुम्ही उशिरा आलात' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन लोकांची दिशाभूल करत असे. अखेर अत्यंत गरजू कुटुंबांपैकी ज्यांच्या रोजच्या खाण्यापिण्यावर याचा खोल व विपरीत परिणाम होत असे अशा लोकांनी कंटाळून 'रचना' संस्थेच्या कार्यकर्त्यांशी संपर्क केला. रचना संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावातील ग्रामपंचायत व समितीचे सदस्य, लोकप्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधला. त्यांना रेशनच्या सर्व समस्या सांगितल्या. संस्था कार्यकर्तीने देखील थोडा पुढाकार घेऊन लोकांच्या घरोघरी जाऊन प्रत्यक्ष भेटून



काळाबाजार करताना पकडलेला माल

विचारपूस करून माहिती जमा केली आणि धक्कादायक आणि विदारक बाब समोर आली. ती म्हणजे गावातील बऱ्याच गोरगरीब कुटुंबांचे धान्य लंपास होत असल्याचे समोर आले. सदर मुद्दा संबंधित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा असे सर्वांचे म्हणणे असले तरी लोकांवर दबाव आणला गेला की मग काही वेळा 'लोक माघार घेतात, काहीच तक्रार नाही' असे म्हणतात.

या पूर्व अनुभवामुळे काय करावे हा प्रश्न पडत होता. शेवटी तक्रारदार कुटुंबांचे लेखी मत व तक्रार घेऊन त्यांच्या सह्यानिशी तालुका पातळीवर तहसीलदार व प्रांत अधिकारी याना भेटावे असे ठरले. त्याप्रमाणे संस्थेचे कार्यकर्ते गावातील काही लोकप्रतिनिधी तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांना भेटले. त्यांना या सर्व घडत असलेल्या गैरप्रकाराबाबत अवगत केले.

त्याचवेळी तालुक्यातील काही प्रभावी सामाजिक कार्यकर्त्यांनी नियोजनपूर्वक सापळा रचून रेशन दुकानदार ७०,००० रुपये किंमतीचे अन्नधान्य काळ्या बाजारात विकत असल्याचे रंगेहात पकडले. माल विकणारा रेशन दुकानदार व विकत घेणाऱ्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गावातील लोकांनी उस्फूर्तपणे या घटनेची फोटोसह बातमी तयार करून सामाजिक माध्यमातून पसरवली. त्यामुळे सर्वत्र तालुकाभर याची चर्चा झाली. इतर गावातील रेशन दुकानदार सावध झाले आणि ग्राहक जागे झाले. रेशन वाटपातील लपवालपवी सध्यापुरती तरी कमी होऊ लागली असल्याचे चित्र तालुक्यात निर्माण झाले.

■

# बिसनी गावातील दहा कुटुंबांना मिळाले 'रेशन'

**शुभम हूड, तालुका समन्वय**
**ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट**
**ता. जि. यवतमाळ.**

'कोरोनाविषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे' या प्रकल्पा अंतर्गत कोव्हिड-१९ टाळेबंदीच्या काळात रेशन यंत्रणेच्या तरतुदीवर आधारित सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यामध्ये गावातील होतकरू, प्रतिष्ठित आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सदस्यांनी प्रत्येक गावातील चार व्यक्तींकडून रेशनविषयक प्रश्नावली भरून घेतली.

ही माहिती घेत असताना यवतमाळ तालुक्यातील 'बिसनी' गावातील रेशन कार्ड नसलेल्या १० कुटुंबांना रेशन मिळाले नसल्याचे समजले. सगळीकडे टाळेबंदी असताना आणि लोकांसमोर रोजगाराचा प्रश्न उभा असताना अशा परिस्थितीत हक्काचे धान्य मिळत नाही, हे लक्षात येताच 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ' या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावातील माजी सरपंच, गाव आरोग्य, पाणी पुरवठा, पोषण आणि स्वच्छता समिती सदस्य, आशा सेविका व रेशन न मिळालेल्या कुटुंबातील सदस्य यांच्याशी चर्चा केली व सगळी हकीकत समजून घेतली.

या चर्चेमध्ये या सर्व कुटुंबांच्या नोंदी ग्रामपंचायतीमध्ये अगोदरच केल्या असल्याचे समजले. शासनाच्या आदेशानुसार



नोंद केलेल्या कुटुंबाला धान्य देणे नियमाला धरून आहे. तरीदेखील गावातील ही गरीब कुटुंबे धान्य मिळण्यापासून वंचित कशी हा प्रश्न समोर उभा राहिला आणि तो सोडविण्यासाठी लगेचच सर्वजण रेशन वितरकाकडे गेले. त्यावेळी गाव समिती सदस्य आणि माजी सरपंच यांनी स्वतः रेशन वितरकास भेटून १० कुटुंबांना शासनाचा आदेश दाखवत त्या आदेशानुसार या १० कुटुंबांना लगेचच धान्य देण्यास सांगितले.

प्रकल्पाच्या निमित्ताने का होईना पण रेशनविषयक सर्व्हे झाला आणि त्यातून शासनाने देऊ केलेल्या लाभापासून वंचित असणाऱ्या बिसनी गावातील त्या १० कुटुंबांना मोफत धान्य मिळवून देण्यात मदत करता आली. आज त्या कुटुंबांना त्यांच्या हक्काचे माणशी पाच किलो मोफत धान्य मिळत आहे.

■

# अखेर आशांना मिळाले 'मास्क'...!

शुभम हूड,
ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट
ता. जि. यवतमाळ.

मार्च २०२० पासून संपूर्ण जगभर 'कोरोना' या विषाणूने थैमान घातलेले असताना लोकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी शासनाने देशभर लॉकडाऊन लागू केले आणि सरकारी आरोग्य यंत्रणेत एकच धावपळ सुरू झाली. आरोग्य यंत्रणा चांगलीच कामाला लागली. वरिष्ठ पातळीपासून अगदी गाव स्तरावर असणारे आरोग्य सेवकही एकजुटीने काम करू लागले. शहरात जशी कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या वाढत होती तशीच ती गाव खेड्यांतही हळूहळू वाढू लागली. ग्रामीण भागात आरोग्याचे काम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे 'आशा सेविका'. गावांमधील कोरोनाच्या रुग्ण संख्येचा आणि एकंदरीत लोकांच्या आरोग्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्याचे महत्त्वाचे काम शासनाकडून आशा सेविकांवर सोपविण्यात आले. याच काळात म्हणजे मे २०२० पासून 'साथी संस्था, पुणे' यांचा 'लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया अंतर्गत कोरोनाविषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे' हा प्रकल्प महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये तेथील संस्थेमार्फत सुरू झाला. या प्रकल्पा अंतर्गत 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ' या संस्थेचे याच तालुक्यामध्ये पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असणाऱ्या २० उपकेंद्र व त्या अंतर्गत

असणाऱ्या गावांमध्ये काम सुरू झाले. या प्रकल्पाच्या माध्यमातून जवळपास ४३ आशा सेविका जोडल्या गेल्या. त्यांच्यासोबत कोरोना व लॉकडाऊन काळामध्ये आरोग्य व्यवस्था आणि सेवा कशाप्रकारे दिल्या जात आहेत, याबाबत सर्व्हेक्षण करण्यात आले व माहिती घेण्यात आली. ही माहिती घेत असताना जवळपास सर्वच आशांनी सांगितले की, 'त्यांना आरोग्य विभागाने सुरुवातीला प्रत्येकी दोन मास्क दिले व ते स्वच्छ करून पुन्हा पुन्हा वापरण्यास सांगितले'. परंतु 'कोरोना' हा विषाणू श्वसन यंत्रणेशी निगडित असल्याने प्रत्येक व्यक्तीचे त्याच दृष्टीने संरक्षण होणे खूप गरजेचे आहे. अपुरे मास्क यामुळे आमचे आरोग्य धोक्यात येऊन संसर्ग होण्याचा धोका वाढू शकतो. गावातील लोकांच्या आरोग्याची माहिती घेण्यासारखी इतकी महत्त्वाची जबाबदारी पार पाडताना खरेतर त्यासोबत आशा सेविकांचे स्वतःचे आरोग्य सुरक्षित असणे देखील खूप गरजेचे आहे आणि त्यासाठी प्रत्येक आशा सेविकेकडे पुरेसे मास्क, सॅनिटायझर व इतर सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आरोग्य यंत्रणेची आहे. सुरुवातीच्या काळात यंत्रणेने ही जबाबदारी पार पाडली देखील. परंतु जसजसे महिने उलटले तसतसे आशा सेविकांकडील हे साहित्य अपुरे पडू लागले.

प्रकल्पांतर्गत केवळ माहिती घेणे इतकेच काम नव्हते तर त्यातून समोर येणारे मुद्दे, आरोग्य सेवकांच्या अडचणी आणि आरोग्य विभागाला सहकार्य करणे हे देखील काम होते. त्यामुळे आशांच्या या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित तालुका समन्वयक यांनी लगेचच पाचही प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मास्क पुरवठ्याबाबत चर्चा केली. वरिष्ठ पातळीवर नेमकी काय अडचण आहे, हे समजावून घेतले. तसेच त्यांना गाव पातळीवर आशांना येणाऱ्या अडचणी देखील सांगितल्या. चर्चेअंती समजले, की तालुका पातळीवरूनच मास्कचा पुरवठा पुरेसा नसल्याने आशा सेविकांना पुन्हा मास्क देता आले नाहीत. अखेर यवतमाळच्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांसोबत संपर्क करून सर्व परिस्थिती पुन्हा एकदा सांगितली. संस्थेकडून सांगण्यात आलेली ही अडचण व वस्तुस्थिती ऐकता तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी लगेचच या ४३ आशांना पुन्हा एकदा प्रत्येकी दोन मास्क देण्याचे आदेश दिले व त्यानुसार दुसऱ्या दिवशी मास्क देण्यातही आले. अशा प्रकारे आशा सेविकांचा प्रश्न मार्गी लागला.

■

# संस्था कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने वेंगरुळ गावातील कुटुबांना मिळू लागले नियमित रेशन

तारय्यप्पा कांबळे, संवाद संस्था,
गारगोटी,
ता.भुदरगड, जि. कोल्हापूर

'कोरोना'विषयक क्षमताबांधणी आणि स्थानिक शासकीय यंत्रणेत अपेक्षित सुधारणा करणे' या 'साथी' संस्था, पुणे यांच्यामार्फत सुरू असलेल्या प्रकल्पातून भुदरगड तालुक्यातील गावांमधून रेशनविषयक प्रश्नावली भरण्यात आली. यावेळी कोरोना काळात शासनाने घोषित केलेल्या मोफत धान्य योजनेतून सर्वांना धान्य मिळत आहे की नाही याविषयी माहिती घेण्यात येत होती. अशी माहिती घेताना वेंगरुळ गावातील अंत्योदय रेशन कार्डधारकांना साखरच दिली जात नाही असे लोकांकडून सांगण्यात आले. या एकाच गावातून साखर दिली जात नसल्याचे समोर आल्याने 'संवाद' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावातील समितीला सुचवले की रेशन दुकानदारांचा संघ असतो त्यात फोन करून तक्रार द्या. मग संबंधित संघ दुकानदाराचा फोन नंबर मिळवून त्यांना गावातील लोकांनी फोन केला. आणि त्या दुकानदाराकडून होत असलेली चूक त्याच्या लक्षात आणून दिली. हा काळाबाजार असल्याचे म्हटल्यानंतर त्यांनी आमची चूक आहे हे मान्य करून लोकांना साखर देतो असे सांगितले आणि इथून पुढे अशी चूक होणार नाही असे आश्वासन दिले.

त्यानंतर संबंधित दुकानदाराने दोनच दिवसात गावातील लोकांना साखर दिली असल्याबाबत लोकांनी फोन करून कार्यकर्त्यांना कळवले. अशा प्रकारची रेशनबाबतची माहिती सर्व गावातून गोळा करत असल्याची आणि स्थानिक लोकांकडून त्यांची पडताळणी करत असल्याची बातमी बऱ्याच गावांपर्यंत पोचली.

सध्या येत असलेल्या रेशनवरील धान्याचे वाटप नक्की कशाप्रकारे होते. यावर देखरेख करण्याची गरज असल्याचे या अनुभवावरून गावातील पोलीस पाटील, सरपंच व लोकप्रतिनिधींना समजले. धान्य दुकानदारावर येथून पुढे धान्य वाटप करताना लक्ष ठेवून चौकशी केली जाईल असे त्यांनी सांगितले. या प्रकारची माहिती संस्थेमार्फत उपलब्ध झाल्यामुळे हे काम करता येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

■

# आरोग्य समिती व सरपंच यांच्या पुढाकारातून अंगणवाड्यांना मिळाले वजन काटे....

कल्पना आवाळे,
रचना संस्था,
ता. भोर, जि. पुणे

भोर तालुक्यातील वागजवाडी गावच्या अंगणवाडीतील वजन काटा बऱ्याच महिन्यांपासून बिघडला होता. अचूक वजन काटा नसल्यामुळे ० ते ६ वयाच्या मुलांची वजने योग्य येत नव्हती. परिणामी गावात SAM/MAM चे बालके किती आहेत याबद्दल नीट माहिती मिळत नव्हती. अंगणवाडी सेविकेसोबत वारंवार बोलूनही फारसा उपयोग होत नव्हता. 'वरूनच वजन काटा मिळत नाहीय, त्यामुळे मला मर्यादा येतात' असे अंगणवाडी सेविकेचे म्हणणे असायचे. तालुक्याला पाठपुरावा केला तर निधीचा अभाव असे उत्तर मिळायचे. एकदाचा हा विषय गावपातळीवर मांडायचा आणि यावर मार्ग काढायचा असे माता बैठकीत ठरले. माता समितीने गावातील आरोग्य समिती व सरपंचाच्या कानावर ही गोष्ट घालून या गोष्टीचे गांभीर्य पटवून दिले.

गाव आरोग्य समिती सदस्य व सरपंच यांच्या पुढाकाराने बैठक आयोजित करण्यात आली. चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून दोन वजन काटे खरेदी करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. २० किलोपर्यंतचा पॅन असलेला छोट्या मुलांसाठी आणि दुसरा मोठ्या मुलांसाठी मोठा वजन काटा घेऊन देण्यात आला. परिणामी गावातील मुलांच्या वजनाच्या नोंदी नियमित व्हायला लागल्यात. हा अनुभव लक्षात घेता ज्या ज्या गावात वजन काट्याचे प्रश्न होते, त्या ४-५ गावांनी देखील चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून वजन काटे खरेदी करून अंगणवाडी कार्यकर्त्यांना दिले. आणि या गावांचा वजन काट्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघाला.

■

# 'ऑनलाईन सर्व्हे'मुळे लोहारा तालुक्यातील बरेच प्रश्न लागले मार्गी

ज्ञानेश्वर निवृत्ती जाधव,
हॅलो मेडिकल फाऊंडेशन
ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

कोरोना काळात गावपातळीवर आरोग्य व रेशनची परिस्थिती जाणून घेण्यासाठी 'साथी' संस्थेमार्फत ऑनलाईन पद्धतीने माहिती गोळा करण्यात आली. लोहारा तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये आरोग्य विभागाकडून आशांना पुरेशा प्रमाणात औषधे, संरक्षक कीट दिले जात नसल्याचे निदर्शनास आले. संस्था कार्यकर्त्यांनी तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत पाठपुरावा सुरू केला. परिणामी आशांना पुरेसा औषधसाठा पुरवण्यात आला.

गावात कोरोना पेशंटचा सर्व्हे करत असताना आशा कार्यकर्त्यांना मास्क, सॅनिटायजरचा पुरवठा पुरेशा प्रमाणात होत नव्हता. आरोग्य यंत्रणेवर कितपत विसंबून राहायचं! याचा विचार करून गावातच हा प्रश्न सोडवायचा, म्हणून गावातील सरपंच, पोलीस पाटील, आरोग्य समिती सदस्य आणि ग्रामसेवक यांच्याशी चर्चा सुरू केली. या चर्चांमधून ग्राम पंचायतीच्या निधीतून आशांना सॅनिटायजर, ऑक्सिमीटर आणि टेम्प्रेचर मशिन देण्याचे ठरले. गावातील आशा आता न घाबरता त्यांचं काम करत आहेत. गावातील लोक फक्त आमच्या कामातल्या कमतरताच काढत नाही, तर वेळप्रसंगी आमच्या मदतीलाही धावून जातात अशी भावना आशा बोलून दाखवत आहेत.

याच सर्व्हेक्षणादरम्यान पुढे आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे गावातील दोन गरीब कुटुंबाकडे गेली १० वर्ष रेशन कार्ड



नव्हते. त्यांना या काळात रेशन कार्ड काढण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मदत केल्यामुळे आता त्यांना नियमित रेशन मिळत आहे.

रेशन दुकानदार रेशन घेतले की पावती देत नव्हते. दोन रुपये दराने मिळणारे गहू तीन रुपयांना तर तीन रुपये दराने मिळणारे तांदूळ ४ रुपयांना विकून रेशन दुकानदार चिरीमिरीचा भ्रष्टाचार करत असल्याचे सर्व्हेक्षणातून पुढे आले. 'साथी'ने दिलेल्या प्रशिक्षण व जाणीवजागृती साहित्यामुळे लोकांमध्ये जागरूकता वाढली. त्यामुळे लोकांना रेशन संबंधीचे हक्क आणि नियमांनुसार धान्याचा पुरवठा कसा आणि किती व्हायला पाहिजे याबाबत माहिती झाली. संबंधित दुकानदाराला लोकांनी जाब विचारायला सुरुवात केली. रेशन दुकानदारावर दबाव वाढला. त्यामुळे अशाप्रकारे चुकीच्या गोष्टी करणे इथून पुढे शक्य नाही हे दुकानदारालाही समजले व गैरप्रकार बंद झाले. आता रेशन दुकानदार गावात सर्वांना रेशनची पावती देतात.

गावातील काही रेशन कार्डांमध्ये मुलांची नावे अंतर्भूत नसल्याने २००२ पासून नियमांनुसार नवीन युनिटला रेशन मिळत नव्हते. त्या मुलांचे शाळेचे पुरावे, आधार कार्ड व रहिवाशी दाखला इ. जोडून या मुलांची नावे रेशन कार्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी तहसीलदार कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यातून चार कुटुंबामधील मुलांची नावे त्यांच्या रेशन कार्डमध्ये समाविष्ट करून घेतली गेली.

■

# पावले चालती... सुरक्षेची वाट

निशा आणेवार, रसिकाश्रय संस्था,
ता. घाटंजी, जि. यवतमाळ

यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यात असणाऱ्या 'शिरोली' गावामध्ये कोरोनाचे रुग्ण वाढतच चालले होते. अशातच मुंबईसारख्या बाहेरील शहरातून येणारे लोक गावांमध्ये बेधडक येऊ लागले होते. कोणतेही नियम न पाळता ते गावात हिंडत होते. शिवाय शासनाने घातलेले नियम न पाळता राहू लागले होते. अगोदरच कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव अन् बाहेरून येणाऱ्या लोकांचे वर्तन यामुळे गावकरी आणि बाहेरून येणारे लोक यांच्यामध्ये वाद होऊ लागले. आशा, अंगणवाडी सेविका व गाव आरोग्य समिती सदस्यांनी देखील यामध्ये हस्तक्षेप केला आणि या सर्वांना विलगीकरणात राहण्यास सांगितले. तरीदेखील ते लोक नियम पळण्यास तयार होईनात.

'साथी' संस्थेमार्फत आयोजित कोव्हिडबद्दलच्या शास्त्रीय प्रशिक्षणात आपल्या गावात कोव्हिडचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून गावाने काय जबाबदारी घ्यावी या सत्रात याविषयी प्रश्न उपस्थित झाला. स्थानिक संस्था कार्यकर्त्यांनी याबाबत विचारविनिमय केला. या मुद्द्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आशांच्या मदतीने पुढचे पाऊल उचलले. गावातील आशांनी जवळच्या पोलीस स्टेशन आणि आरोग्य विभागाला याबाबत कळविले. ही बाब समजताच दोन्ही विभागाच्या यंत्रणेची टीम गावात ताबडतोब हजर झाली. आणि बाहेर शहरातून येणाऱ्या सर्व लोकांना कडक शब्दात समज दिली. याशिवाय त्यांना लगेचच विलगीकरणात ठेवले. आशा कार्यकर्त्यांनी योग्य वेळी उचललेल्या पावलांमुळे गावातील लोकांची सुरक्षितता टिकून राहण्यास मदत झाली. बऱ्याचदा लोकांना त्यांच्याच सुरक्षेचे नियम कठोर पावले उचलून सांगावे लागतात.

■

# 'कोव्हिड केअर सेंटर' मधील भोंगळ कारभाराला बसला आळा...

कल्पना आव्हाळे, रचना संस्था,
ता. भोर, जि. पुणे

भोरमध्ये कोव्हिड - १९ पॉझिटिव्ह रुग्णांसाठी करण्यात आलेल्या कोव्हिड - १९च्या कक्षात व्यवस्था व नियोजन नीट नसल्याची बाब निदर्शनास आली. बेफिकीर कर्मचारी, गोंधळलेल्या अवस्थेतील साशंक नातेवाईक, काळजीत असलेले रुग्ण अशी या कोव्हिड केअर सेंटरची अवस्था होती. कोव्हिड चाचणीसाठी आलेले आणि कोव्हिड पॉझिटिव्ह पेशंटला या 'कोव्हिड केअर अँड ट्रीटमेंट सेंटर (CCTC)' मध्ये एकत्रच ठेवले जायचे. संबंधित रुग्णांना स्वतंत्र ठेवण्याच्या मागणीकडे सेंटरच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. 'रचना' संस्थेच्या कार्यकर्त्या कल्पना आवळे यांच्या निदर्शनास हा मुद्दा आल्यावर त्यांनी सरपंच, पोलीस पाटील व देखरेख समितीच्या सदस्यांसोबत कोव्हिड केअर सेंटरला भेट दिली. पंचायत समिती सदस्यांना भेटून सेंटरमधल्या भोंगळ कारभाराची तक्रार केली.

पंचायत समिती सदस्यांनी याबाबत तालुका आरोग्य अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. संस्था कार्यकर्ते, गावपातळीवरील समिती सदस्य अशा सर्वांच्या दबावामुळे आणि पाठपुराव्यामुळे सदर संबंधित आरोग्य यंत्रणेला ठोस पावले उचलावी लागलीत. कोव्हिड केंद्राचे इनचार्ज डॉ. भोंगे यांनीही विषयाचे गांभीर्य समजावून घेऊन त्वरित उपाययोजना केल्या. परिणामी कोव्हिड केअर सेंटरमधील कारभार सुरळीत व नियोजनबद्ध झाला. तसेच रुग्णांच्या प्रती कर्मचाऱ्यांच्या वागणुकीत सकारात्मक बदल झाला.

■

# कुपोषणाच्या विळख्यातून होम व्हीसीडीसीने केली बालकांची सुटका

श्रीपाद कोंडे, रचना संस्था,
ता. वेल्हे, जि. पुणे

कोव्हिड १९ काळात बालकांचे कुपोषण नियंत्रित करण्यासाठी वेल्हे तालुक्यात विशेष प्रयत्न करण्यात आले. 'रचना' संस्थेच्या माध्यमातून हा प्रश्न तालुका अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये चर्चेत आणण्यात आला. या बैठकीत तालुका पातळीवर गट विकास अधिकारी, एकत्मिक बाल विकास अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. अंगणवाडीमधील ज्या मुलांच्या तपासण्या बाकी होत्या, तसेच काही तीव्र कुपोषित बाळांची पुन्हा तपासणी करणे गरजेचे होते. अशा कमी वजनाच्या सॅम व मॅम मुलांची विशेष काळजी घेण्यासाठी स्वतंत्र तपासणीचा आणि त्यांनतर घरीच व्हीसीडीसी दोन महिने चालवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

('व्हीसीडीसी' म्हणजे 'व्हिलेज चाईल्ड डेव्हलपमेंट सेंटर' म्हणजे कुपोषित मुलांसाठी दररोज पाच वेळा नियमित आहार देण्यासाठी हे केंद्र अंगणवाडीमध्ये चालवले जाते. पण कोरोनाच्या काळात अशाच प्रकारे घरात राहून मुलांची काळजी घेतली जावी आणि त्यांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावे या उद्देशाने हे केंद्र)

गर्दी न जमवणे व कोरोनाचा धोका लक्षात घेता उपकेंद्र, प्रा.आ. केंद्र पातळीवर या मुलांच्या तपासण्या आठ दिवसांच्या मुदतीत करण्यात आल्या. मुलांच्या आयांना काळजी व देखभालीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. विविध पोषण साहाय्यक घटक



असलेले सकस पदार्थ तसेच शक्तिवर्धक औषधे, टॉनिक्स लोकवर्गणीतून व लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या सहभागाने पुरवण्यात आले. तर आजारी मुलांना आजारावर सिरप किंवा गोळ्या सरकारी दवाखान्यातून देण्यात आल्या. मातांसोबत आशाच्या माध्यमातून पाठपुरावा, गृहभेटी चालू ठेवल्या. अंगणवाडी सेविका यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून घेतले. या उपक्रमात प्रकल्पाचे तालुक्यातील महिला बाल कल्याण अधिकारी, पर्यवेक्षक, उपकेंद्र स्तरावरील नवनियुक्त डॉक्टर, नर्स तसेच तालुक्याचे गट विकास अधिकारी, RBSK चे डॉक्टर यांनी विशेष पुढाकार घेतला.

या कार्यक्रमात गावपातळीवर ग्रामपंचायत स्तरावरून आर्थिक तरतूद करण्याच्या सूचना गट विकास अधिकाऱ्यांनी दिल्या. पुढे दोन महिने गावागावात अशा होम व्हीसीडीसी सुरू राहतील याची तजवीज करण्यात आली. यासाठी जर गरज भासली तर मुलांना लागणारी शक्तिवर्धक व इतर औषधे लोकसहभागाद्वारा घेण्यात येतील असेही ठरवण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी मातांना तपासणीच्या वेळी देखील पोषणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासनाची तरतूद नसताना देखील गावोगावी ४६ तीव्र कुपोषित मुलांसाठी घरातच व्हीसीडीसी सुरू झाली आणि ही मुले कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर पडली.

■

# टाळेबंदीत एचआयव्हीबाधित रुग्णांना गोपनीयता पाळून घरपोच पुरवलीत औषधी आणि आहार...

**रवी देसाई, संवाद संस्था**
**बुदरगड, जि. कोल्हापूर**

सन २०२० मधील मार्च महिना जणू काही कोरोनासोबतच भीती, संभ्रम आणि माणसाला माणसापासून दूर करण्यासाठीच उजाडला. या विषाणूबाबत संपूर्ण जगभर सगळे गैरसमज पसरत होते. इतर देशांप्रमाणे भारतातही कर्फ्यू आणि लॉकडाऊन नावाने जनतेस बंदिस्त करण्याचा निर्णय घ्यायला सुरुवात केली.. शहरांबरोबर गावातील आणि वस्त्यांवरील जनतासुद्धा घराच्या आत बंदिस्त राहावी म्हणून अनेक बंदी आदेश लागू झाले. या आदेशाचं पालन जनतेनं करावं असं आवाहन करताना स्थानिक प्रशासनावर ही बंदीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दिली. मग काय रस्त्यावर पोलीस आणि सार्वजनिक आरोग्य संस्थेत डॉक्टर यांच्यावर देखरेखीसाठी महसूल खात सज्ज झालं. मग यातून लॉकडाऊन यशस्वी करण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू झाला पण जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागू लागले. त्यामुळे लोक वेगवेगळ्या कारणांनी रस्त्यावर येताहेत हे सरकारच्या लक्षात आल्यावर गावपातळीवर 'कोरोना दक्षता समित्या' स्थापन करण्याचे स्वतंत्र आदेश निघाले व त्या समित्यांना जबाबदाऱ्या व अधिकार निश्चित करून दिलेत. त्यात गावातील जनतेला जर आवश्यक सेवेसाठी घराबाहेर किंवा गावाबाहेर जावं लागत असेल तर या गावातील

दक्षता समितीची परवानगी घ्यावी असं सांगितलं. त्यानुसार लोक या समित्यांच्या समोर जाऊन आपलं घराबाहेर, गावाबाहेर जाण्याचं कारण सांगून त्यांचं पत्र मिळवून घेत होते.

या दरम्यानच्या काळात अनेक सामाजिक काम करणारे लोकं, संस्था-संघटना विविध स्वरूपात लोकांना मदत पोहचवत होते. त्याप्रमाणे आम्ही 'संवाद' संस्थेच्या माध्यमातून, मोलमजुरीसाठी आलेल्या पण टाळेबंदीमुळे अडकून राहिलेल्या कुटुंबांना, लोकांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तू पुरवत होतो. लोकांमध्ये कोरोना व कोविड - १९ बाबत जागृती व्हावी, गैरसमज दूर व्हावेत म्हणून सरकारी आरोग्य संस्थेत माहिती व मदत केंद्र उभारून लोकांना माहिती देत होतो, त्यांच्या अडचणी समजून घेत होतो.

त्यावेळी ग्रामीण रुग्णालयात एक व्यक्ती इतरांपासून स्वतःला लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत इतरांच्या नजरा चुकवत बावरलेली दिसली. त्या व्यक्तीला भेटून त्याची अडचण समजून घ्यायचा प्रयत्न केला तर त्या व्यक्तीने आम्हास टाळण्याचा प्रयत्न केला. आम्ही त्यांना विश्वास दिला की, 'तुमची अडचण सांगा, आम्ही ती दूर करण्याचा प्रयत्न करू व सर्व माहिती गुप्त ठेवू'. त्याचवेळी या रुग्णालयातील समुपदेशकांनी आमच्याकडे पाहिले व जवळ येऊन त्यांनी आम्हाला सांगितले की, 'ही व्यक्ती अँटी रेट्रो व्हायरल थेरपी (एआरटी) अर्थात एड्सवरील उपचार घेणारी आहे. आणि त्यांना उपचार घेण्यासाठी जिल्हा रुग्णालयात जावे लागणार आहे.' यातून झालेल्या चर्चेतून लक्षात आले की यासाठी या कोरोना दक्षता समितीची परवानगी घ्यावी लागणार आहे व ती घेण्यासाठी आजाराचं नाव व कोठे उपचार घेणार हे सांगावं लागतं आणि जर या आजाराच नाव समितीस सांगितलं तर गोपनीयता संपुष्टात येऊन गावकरी रुग्णाला कशी वागणूक देतील आणि त्यामुळे पुन्हा रुग्ण मानसिक दबावाखाली जाऊन आजारी होऊ शकतो हे आमच्या लक्षात आले.

ए आर टी केंद्रामधून समजले की तालुक्यात तब्बल १०० ते १२० रुग्ण अशा प्रकारचे आहेत, त्या सर्वांची ही अडचण आहे. आम्ही हेही समजून घेतले की या व्यक्तींना जिल्हा रुग्णालय किंवा उपजिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष जाऊन संबंधित तज्ज्ञाकडून उपचार घ्यावे लागतात. यावेळी आम्ही ही गोष्ट जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य विभाग कार्यालयाच्या निर्दशनास आणून दिली व समुपदेशक यांना ही बाब त्यांच्या वरिष्ठ स्तरावर निर्दशनास आणून देण्याची विनंती केली. जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य विभाग यांच्यासोबतच्या पाठपुराव्यातून काय करू शकतो




याबाबत चर्चा करण्यात आली आणि संबंधित अधिकाऱ्यांनी लगेचच निर्णय घेतला. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी संबंधित रुग्णांची माहिती घेऊन तालुक्यातील जवळपास ४० रुग्णांना येथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून उपचाराचे संच (कीट) दिले व त्यांच्या सहकार्याने त्या लोकांच्या घरात किंवा ग्रामीण रुग्णालयात उपचार उपलब्ध झाले.

याचवेळी असे उपचार घेणाऱ्या रुग्णांना पोषण आहार मिळणे आवश्यक आहे ही गोष्ट देखील समोर आली. त्यावेळी सरकारने मोफत रेशन दिले आहे, सामाजिक संस्था सुद्धा गरजू लोकांना अन्न धान्य पुरवत आहेत हेही समजले. पण याच्यापेक्षा वेगळा आहार यांना गरजेचा आहे आणि तो आहार यातील काही व्यक्तींना मिळणे कठीण आहे हे लक्षात आल्यावर असा आहार आपण पुरवला पाहिजे असा विचार आला. आणि लगेच समुपदेशक, तंत्रज्ञ व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी होकार दिला व स्वतःच्या खिशातून पाचशे-हजार रुपये जमवून अशा रुग्णांना अतिरिक्त पोषण आहार पुरविला ही बाब खूपच महत्त्वाची होती. यातून ज्या एचआयव्हीबाधित लोकांना हा विशेष आहार व साहित्य मिळाले त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान खूप मोठे होते.

■

# स्वयंसेवकांच्या पुढाकारामुळे सुटला गुरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न

**अलका पाटील, संग्राम संस्था,**
**ता. शिराळा, जि. कोल्हापूर**

कोरोनाच्या वाढत्या संख्येमुळे शिराळा तालुक्यातील मणदूर गावात लॉकडाऊनचे दिवस वाढत गेले. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे हाल होऊ लागले. शेतात जाता येत नव्हते. पेरण्या, जनावरांचे दूध, जनावरांना चारा आणणे, जनावरे चरण्यासाठी सोडणे अशा गोष्टी जवळ जवळ ठप्पच झाल्या होत्या.

लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा समिती सदस्यांनी गावात स्वयंसेवकांची समिती नेमली. स्वयंसेवकांनी लोकांना गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करण्यास सुरवात केली. दळण-कांडण, बी. पी. शुगरच्या गोळ्या इ. अत्यावश्यक वस्तूंची सेवा घरपोच देऊ लागले.

तर दुसरीकडे लॉकडाऊनमुळे वैरण आणता येत नसल्याने गुरा-ढोरांचे पण हाल सुरू झाले. घरात असलेला चारा संपला होता. घरटी ५ ते ७ जनावरे असल्याने या सर्वांना काय खाऊ घालायचे? या चिंतेत गावातील लोक होते. यावर उपाय म्हणून स्वयंसेवकांनी देखरेख समितीच्या अध्यक्षा व पंचायत समितीच्या सभापती यांच्यासोबत मीटिंग घेऊन गावातील प्रश्न मांडले. सदर बातमी स्थानिक वृत्तपत्रात देऊन आजूबाजूच्या गावांमध्ये मदतीचे आवाहन केले. बातमीमुळे आजूबाजूच्या गावांमधून लोकांनी घरटी चारा गोळा करून मणदूर गावात पोहोचवला.

आलेला चारा स्वयंसेवकांनी घरटी वाटला. अशा प्रकारे गावात रोज दोन चार चाऱ्याचे ट्रॅक्टर येऊ लागले. बऱ्याच कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या दुभती जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मणदूर गावातील स्वयंसेवकांच्या परिश्रमातून मार्गी लागला.


■

# ‘साथी’मार्फत ‘कोव्हिड १९ विषयीच्या प्रशिक्षणा’चा झाला फायदा!

## आशा व आरोग्य सेविकांची बोलकी प्रतिक्रिया

ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

मार्च २०२० पासून सुरू झालेल्या ‘कोरोना’ साथीने सगळं जग बंद पाडलं. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यामध्ये लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेने आतापर्यंत आरोग्याचे विविध प्रश्न सोडवण्याचा चांगला प्रयत्न केला होता. परंतु कोरोनामुळे जाहीर केलेल्या लॉकडाऊनमध्ये लोकांशी प्रत्यक्ष संवाद करणे सुद्धा अवघड झाले. अशा अवस्थेत आरोग्याशी संबंधित बऱ्याच अडचणी समोर येत होत्या. त्या अडचणी वेळेत सोडवणे गरजेचे होते. पण संवाद कसा करायचा? कोव्हिड १९ ची माहिती लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक होते ती माहिती कशी पोहोचवायची? हा प्रश्न पडला होता. त्यावेळी ‘साथी’ संस्थेमार्फत कोव्हिड १९ संबंधी नियोजनबद्ध रितीने सुरू झालेल्या कामामुळे बऱ्याच गोष्टी करणे आणि तालुक्यातील आरोग्यासंबंधी असलेल्या अडचणी सोडवणे सोपे झाले. साथी संस्थेकडून या आजाराची बरीच शास्त्रीय माहिती मिळाली. संवाद करण्यासाठी माध्यम म्हणून व्हाट्सअप ग्रुपची कल्पना राबवली गेली. एका आठवड्यात अक्कलकोट तालुक्यासाठी व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला. हा ग्रुप कोरोनाबाबत शास्त्रीय माहिती आणि गावात योग्य शासकीय संदेश पोहोचवण्यासाठी असल्याचे सर्व सदस्यांना सांगितले.



डॉ. हेमराज पाटील सर :—

ANC बद्दल जी माहिती दिली ती मला फार उपयुक्त वाटली. ANC मध्ये आपण High Risk ठरवतो. कारण प्रत्येक ANC माता + प्रसूतीनंतर बाळ या दोघांना दोघांचाही जीव सांभाळून घेण्याची आवश्यकता आहे. जर माता +ve असल्यास तरीही बाळाला कोरोना होत नाही. आईच्या दुधात देखिल कोविड व्हायरस नसतात. बाळाला व आईला प्रसुती नंतर लगेच विलग केले पाहिजे. पण आपण हात स्वच्छ धुऊन, मास्कमध्ये आईचे दुध काढून बाळाला पाजू शकतो. पण आई -ve होई पर्यंत बाळाला आई जवळ देऊ नये.

ही नवीन माहिती आम्हाला मिळाली.

छा प्रशिक्षणामध्ये वापरलेली भाषा खूप सोपी व लवकर सर्वांना समजण्यासारखी आहे. यापूर्वीही हा प्रशिक्षण मला मिळालेली आहे. पण पुन्हा एकदा प्रशिक्षण झाल्याने आमच्या ज्ञानात भर पडली.


धन्यवाद!

2020.09.19 16:02

या गटांमध्ये आशा, अंगणवाडी सेविका, ग्राम आरोग्य पोषण समितीचे सदस्य, अध्यक्ष यांचाही समावेश असल्यामुळे त्यामुळे गावात काम करताना कोरोनाविषयी सर्व माहिती मिळाली. गटामध्ये एकूण ७६ सदस्य होते. साथी संस्थेकडून वेळोवेळी गटाला पोस्टरद्वारे कोव्हिड १९ मध्ये घ्यावयाची काळजी, कसे सजग राहिले पाहिजे याविषयी माहिती दिली. रेशनविषयीही पोस्टरद्वारे माहिती दिली. तालुक्यातील लोकांपर्यंत ही माहिती पोहोचेल याची खबरदारी आम्ही कार्यकर्ते घेत होतो. गटात आशा, सरपंच, तंटामुक्त अध्यक्ष यांचा समावेश असल्याने गटातील सदस्यांसाठी ऑनलाईन प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले.

३ ऑगस्ट, २०२० राखी पौर्णिमा हा सणाचा दिवस असूनही आशाताई, अंगणवाडी सेविका, नर्सताई आणि गावपातळीवरील समिती सदस्यांनी भाग घेतला. सर्वांनाच सदर प्रशिक्षण खूप आवडले.

आम्हाला गावात कोव्हिडचा सर्व्हे करावा लागतो, तो करताना आम्हाला आधी भीती वाटत होती, प्रशिक्षणातून मिळालेल्या शास्त्रीय माहितीमुळे घराबाहेर असताना किंवा



घरी आल्यानंतर काय काळजी घ्यायची याबद्दल माहिती मिळाल्याने आमची भीती फारच कमी झाली. तसेच या अगोदर आम्हाला आरोग्य विभागामार्फत प्रशिक्षण मिळाले होते. पण ते तेवढे समजले नव्हते. साथीच्या प्रशिक्षणात सोप्या भाषेत माहिती दिली होती, ती समजेल अशी उदाहरणेही दिली. साथीचे कार्यकर्ते घरातील मंडळींना सांगावे अशा आपुलकीने प्रशिक्षण करत असल्यामुळे ते आम्हाला अधिकच आवडले व तितकेच फायदेशीर ठरले असं अनेक आशांनी सांगितले.

या माहितीच्या आधारे सर्व्हेक्षण करायला फार मदत झाली. लोकांचे प्रश्न, त्यांच्या शंका-कुशंका, गैरसमज याबाबत समर्पक अशी उत्तरे आशा देत आहेत व कुटुंबात आपण कसे दक्षतेने वागावे हे समजून घेतल्याने त्या माहितीचा फायदा झाला असे प्रशिक्षणात सहभागी असलेल्या काही गाव आरोग्य समिती सदस्यांनी सांगितले.

साथी मार्फत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणाचा फायदा कसा झाला याबाबत वागदरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या भुरीकवठा उपकेंद्रामधील आरोग्य सेविकेने दिलेली प्रतिक्रिया...

■














लोकमत

राजेंद्रकुमार जाधव : ५० खाटांसह व्हेंटिलेटरची सुविधा, रुग्णांची गैरसोय टळणार

# भोरमध्ये कोविड हेल्थ सेंटर सुरु

बाह्यरुग्ण विभाग शिक्षण भवन इमारतीत







कोव्हिडच्या परिस्थितीमधून सध्या सगळं जरी पूर्वपदावर येत असलं तरी कोव्हिडने काळ थांबवला होता. भविष्याची अनिश्चितता, वर्तमानात जगण्याचं उभं राहिलेलं संकट यात अनेक आयुष्य होरपळून निघाली होती. आरोग्याच्या ह्या प्रश्नामुळे थांबलेला काळ आजवर कुणी पाहिला नव्हता. काळानं माणसं थांबवण्याचा प्रयत्न केला असला तरी माणसांनी मात्र त्यावर मात करत 'एकमेका साहाय्य करू। अवघे धरू सुपंथ' हा पवित्रा अंमलात आणला.

अनेक लहान लहान खेड्या-पाड्यात अडलेल्या, अडकलेल्या माणसांना हात देत त्यांना बाहेर काढण्याचे काम अनेकांनी आपापल्या परिने केले. अशा कथा ज्यांची 'दखल' नक्की घेतली पाहिजे...


प्रकाशक

**साथी**

फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०३८.
फोन : ०२० - २५४७२३२५ / २५४७३५६५
ई-मेल : sathicehat@gmail.com
वेबसाईट : www.sathicehat.org
सप्टेंबर २०२०


साथी
Support for Advocacy and Training to Health Initiatives